| MHOS080007802021 | नियमित दिवाणी दावा क्र. २५१/२०२१<br>संभाजी कांबळे वि. किसन कांबळे व इतर |
|---|---|

**निशाणी क्रमांक ५० वर आदेश पारीत**

सदरचा अर्ज हा प्रतिवादी यांनी दिनांक ०४/१२/२०२४ रोजी वादी सा.क्रं. १ यांच्या पुराव्याचे शपथपत्र निशाणी क्र. ४६ वर झालेला 'उलटतपास नाही' चा आदेश रद्दबातल होऊन त्यांना उलटतपास घेण्यास परवानगी मिळणेसाठी दाखल केला आहे.

२. प्रतिवादींचे असे कथन आहे की, दिनांक ०४/१२/२०२४ रोजी प्रतीवादींचे विधीज्ञ यांना त्यांचे कौटुंबीक कार्यक्रम असल्यामुळे वादीचा उलटतपास घेता आला नाही. सदर कारणास्तव प्रतीवादींनी वादीचे पुराव्याचे शपथपत्र निशाणी क्र. ४६ वर प्रतिवादींविरुध्द झालेला 'उलटतपास नाही' चा आदेश रद्दबातल होऊन त्यास उलटतपास घेण्याची संधी दयावी अशी विनंती केली.

३. वादीने त्यांचे म्हणणे अर्जाच्या पाठीमागे दिलेले आहे. त्याचे असे म्हणणे आहे की, वादीचे वय ८० वर्षे आहे. प्रतिवादी व त्यांचे वकील हे सदरचे प्रकरण प्रलंबीत ठेवीत आहेत. करीता अर्ज नामंजुर करण्याची विनंती केली.

४. प्रतिवादी व वादी यांच्या विद्वान विधीज्ञ यांचा युक्तीवाद ऐकला. अर्जाचे व अभिलेखाचे अवलोकन केले. प्रस्तुत प्रकरणात वादीने त्यांचे पुराव्याचे शपथपत्र दिनांक १२/०६/२०२४ रोजी दिलेला आहे व तदनंतर सदरचे प्रकरण हे प्रतिवादींनी वादीचा उलटतपास घेण्यासाठी प्रलंबीत राहिले आहे. प्रस्तुत अर्जामध्ये प्रतिवादींनी कोणतेही संयुक्तीक कारण दिलेले नाही. परंतु सदर प्रकरण स्थावर मिळकतीशी संबंधीत असल्यामुळे न्यायाच्या दृष्टीने प्रतिवादींना

वादीचा उलटतपास घेण्याचा हक्क व त्यांची बाजु मांडण्याची संधी देणे न्याय व योग्य वाटते. प्रतिवादींमुळे प्रस्तुत प्रकरणात झालेला विलंब लक्षात घेता योग्य त्या खर्चावर अर्ज मंजुर करणे न्यायोचित आहे. करीता खालील आदेश पारीत करण्यात येत आहे.

## आदेश

१. प्रतिवादींविरुध्द झालेला निशाणी क्र. ४६ वरील 'उलटतपास नाही' चा आदेश रद्दबातल होऊन त्यांना उलटतपास घेण्याची परवानगी रक्कम रुपये ८००/– च्या खर्चावर देण्यात येते.

२. प्रतिवादींनी वरील नमुद खर्च वादींना दयावा.

३. खर्च दिल्यानंतर प्रतिवादींना वादीचा निशाणी क्र. ४६ वरील उलटतपास घेण्यास परवानगी देण्यात येते.

Shyam Shrinivas Kalaskar

Digitally signed by Shyam Shrinivas Kalaskar
Date: 2025.01.17 18:06:03 +0000

**स्थळ – लोहारा.** **(एस.एस. कळसकर)**

**दिनांक १७/०१/२०२५** **दिवाणी न्यायाधीश क.स्तर, लोहारा.**

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this P.D.F. file Judgment are same word to word, as per the original Judgment.

| | | |
|---|---|---|
| Name of the Stenographer | : | R.M. Kokare |
| Court Name | : | Shri. S.S. Kalaskar, CJJD Lohara. |
| Date | : | 17.01.2025 |
| Judgment signed by the Presiding Officer on | : | 17.01.2025 |
| Judgment uploaded on | : | 17.01.2025 |